सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मामुली~~/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ४०० ठ. क्र. ३२५
दि. २३/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



**सर्वांसाठी घरे** संकल्पनेवर आधारीत **प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करणेबाबत** प्रस्तावात सविस्तर माहिती असून प्रस्तावात नमूद कारणास्तव केंद्र शासनाने जाहीर केलेल्या व महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार **सर्वांसाठी घरे** संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये प्रस्तावात नमूद ४ घटक समाविष्ट आहेत. **१)** जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करुन त्यावरील झोपडपट्टयांचा **आहे तेथेच** पुनर्विकास करणे **२)** कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणा-या घरांची निर्मिती करणे **३)** खाजगी भागीदारीद्वारे परवडणा-या घरांची निर्मीती करणे **४)** आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील लाभार्त्याद्वारे वैयक्तीक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान प्रस्तावात नमूदप्रमाणे सदर योजनेची माहिती असून ती सोलापूर शहरात राबविणेकरिता सदर योजनेस मा.मनपा सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मंजूरी मिळणेस त्या अनुषंगाने प्रस्तावात नमूद संदर्भीय शासन निर्णयातील पृष्ठ क्र. ९, अ.क्र. १५ मध्ये **ज्या शहरांनी राजीव आवास योजने अंतर्गत सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण केले आहे. अशा शहरांना सदर सर्व्हेक्षणास अनुलक्षून प्रस्ताव सादर करणेस अनुमती दर्शविण्यात येत आहे** असे नमूद आहे. त्याप्रमाणे राजीव आवास योजने अंतर्गत आजमितीस १९६ झोपडपट्टयातून सर्व्हेक्षण पूर्ण झालेने सदर सर्व्हेक्षणास अनुसरुन प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत लाभार्थी निकषात बसणारे झोपडपट्टी रहिवाश्यांचे झोपडपट्टयातुन प्रस्ताव सादर करणे, भागीदारी तत्वावर परवडणारी घरे निर्माण करणेचे प्रकल्प व वैयक्तीक घरकुल बांधणेचे प्रकल्प अहवाल तातडीने दोन आठवडयात तयार करणे, तो निधी मिळणेकरिता शासनास सादर करणे, त्याकरिता पत्रव्यवहार करणे इ. बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देणेस झोपडपट्टीचे सर्व्हे झाले आहे आणि पूर्ण शहराचे सर्व्हे होणे गरजेचे आहे त्याप्रमाणे मा. सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १७-२-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

तसेच झोपडपट्टी व्यतिरिक्त शासन निकषात बसणा-या सर्व लाभार्थ्यांचे सर्व्हेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन तो मंजूरीस्तव शासनास सादर करणेस तसेच आवश्यक वाटलेस म.न.पा.हिस्सा सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात तरतूद करणेत येईल त्यास मान्यता देणेत येत आहे. याबाबत वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करावे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रामुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२०७ ठ. क्र. ३२६
दि. २३/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



मा. केंद्र शासनाचे अमृत योजनेतील पाणी पुरवठा कामासाठी सहभाग नोंदविणेबाबत प्रस्तावात सविस्तर माहिती असून, प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावातील नमूद सर्व बाबी विचारात घेता सोलापूर महानगरपालिकेकडून अमृत योजने संदर्भात (Atal Mission for Rejuvenation and Urban transformation) पाणीपुरवठा, सौर उर्जा, बगीचा/ग्रीन स्पेसेसचे बाबींचे प्रकल्प राबविणेस त्यासाठी योजनेअंतर्गत मंजूरी मा. केंद्र शासन, मा. राज्य शासन, महानगरपालिका हिश्यापोटी ५०:२५:२५ चे आकृतीबंधाप्रमाणे योजना राबविणेस, त्यानुसार मंजूर र.रु. ८२.२८ कोटीचे प्रस्ताव मा. केंद्र शासन, मा. महाराष्ट्र शासन, महानगरपालिका यांचे र.रु. ४१.१४ कोटी : २०.५७ कोटी : २०.५७ कोटी आर्थिक आकृतीबंधाप्रमाणे महानगरपालिकेकडून २०.५७ कोटीचा हिस्सा उचलणेस तयार असणेबाबत व सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात त्यापैकी र.रु. १०.०० कोटीची बजेट तरतूद उपलब्ध करणेस व प्रस्तावातील सविस्तर पूर्वगणनपत्रकानुसार प्रत्यक्ष योजनेचे होणारे आर्थिक तरतुदीनुसार कार्यवाही ठेवणेस मा. शासन निर्णयानुसार योजना अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूकीचे अनुषंगाने, तसेच योजना राबविणेचे अनुषंगाने मा. शासन स्तरावर आवश्यक तो पत्रव्यवहार करणे संदर्भात मा. आयुक्त यांना अधिकार देणेस तसेच सदरचे विषयासंदर्भात तात्काळ कार्यवाही करावयाची असलेने प्रकरणी मा. सर्वसाधारण सभेची सक्षम मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १७-२-१६ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासंगिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 354 ठ. क्र. 324
दि... 23/2/16 ..... रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



प्र.क्र. ११ ब भजन कोटरी येथे वाचनालय बांधणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र./सन २०१५-१६ र.रु. २,९९,६००/- यांस जागा मालकी खाजगी असल्याने मा. स्थापत्य समितीची शिफारस मिळून मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३१-८-२०१५ टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. १७३, दि. २०-१-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मामुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.३५८ ठ. क्र. ३२५
दि. २३/२/१६ राजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



प्र.क्र. ४८ अ मध्ये ए. जी. पाटील कॉलेज ते लोकू तांडा येथे पाण्याची पाईप लाईन टाकणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. र.रु. १६,८०,५५०/- यांस मा. स्थापत्य समितीची शिफारस होऊन मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २८-११-१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. १७७, दि. २०-१-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३५१ ठ. क्र. ३२९
दि... २३।२।१६... रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महात्मा गांधी प्राणी संग्रहालय परिसराभोवती संरक्षण भिंत बांधणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र. र.रु. १,३८,४५,६५१/- यांस मा. स्थापत्य समितीची मान्यता होऊन बजेट तरतूदीस अनुसरुन मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २३-१२-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. १८३, दि. २०-१-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुलो/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 360 ठ. क्र. 330 दि. 23/2/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

भिमा नदी टाकळी योजने अंतर्गत सोरेगाव येथील जलशुध्दीकरण केंद्रामधील फिल्टर बेड बदलणे व किरकोळ दुरुस्ती करणे कामाचे फेर पूर्वगणनपत्रक क्र. २ सन २०१४-१५ र.रु. १,०६,७७,५९६/- यांस व प्रकरणी लागणारे जादा तरतूद र.रु. २९,६६,२४१/- यांस मा. स्थापत्य समितीची शिफारस होऊन मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ३०-१२-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. १९२, दि. ५-२-२०१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदरकामी सन २०१५-१६ चे भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यातील अ.क्र. ८ पाण्याच्या टाक्या बांधणे व पाईप लाईन घालणे या सदरी तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुख्यो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३६२ ठ. क्र. ३३२
दि... २३/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



बलिदान चौक हुतात्मा स्मारक स्तंभ सुशोभिकरण/नुतनीकरण करणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र.-२०१५-१६ र.रु. ३९,५०,८५६/- यांस व बलिदान स्मारक स्तंभ सुशोभिकरण करणे प्रस्तावात नमूद कारणास्तव उपरोक्त उपलब्ध तरतूद र.रु. १०.०० लक्ष वजा जाता उर्वरीत रक्कम रु. २९,५०,८५६/- ची तरतूद होवून मा. स्थापत्य समितीची शिफारस होवून मा. सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ११-१-१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. १९७ दि. ५-२-१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

याकामी सन २०१५-१६ चे भांडवली कामाच्या खर्चाचा तक्त्यातील अ.क्र. ३ शहरातील पुतळे परिसर सुधारणा करणे व नवीन पुतळे बसविणे व स्मारक बांधणे या सदरातून तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासुली/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 363 ठ. क्र. 332
दि... 23/2/16 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



जुना पुना नाका येथील आयलँड मध्ये सुशोभिकरण करणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र.४२/२०१५-१६ र.रु. १७,६५,६२३/- यांस मा. स्थापत्य समितीची शिफारस होऊन मा. सर्वसाधारण सभेकडे बजेट तरतूद उपलब्ध होवून मिळणेकामी व पूर्वगणनपत्रकास मा. आयुक्त यांचे दि. २२-१-१६ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २०१, दि. ५-२-१६ चे शिफारसीप्रमाणे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदर प्रकरणी र.रु. १७,६५,६२३/- च्या पुर्वगणनपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका